*B.S.P's*
*Gomantak Ayurveda Mahavidyalaya & Research Centre*
*Vajem, Shiroda - Goa*

---

**वारंवार डोकेदुखी संबंधित आजारांवर आयोजित चिकित्सा शिबिराला उत्स्फुर्त व उदंड प्रतिसाद**

भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र व कामाक्षी आरोग्यधाम, शिरोडा - गोवा येथे शुक्रवारी दि.२० सप्टेंबर २०१९ रोजी वारंवार डोकेदुखी संबंधित आजारांवर एक चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात अनेक रूग्णांनी उपस्थित राहुन शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरात वैद्य प्रणव भागवत व वैद्य सुरज पाटलेकर यांनी रूग्णांच्या वारंवार होण्याऱ्या तक्रारी जसे वारंवार डोकेदुखी, लख्ख प्रकाशाचा त्रास होणे, डोके जड होणे, प्रवासानंतर डोकेदुखी वाढणे, अर्धाशिशि इत्यादि तक्रारींवर उपाय योजना केल्या. या शिबिराला रूग्णांचा उदंड प्रतिसाद लाभला व वेळे अभावी राहिलेल्या रूग्णांना येत्या आठवडयात तपासण्यात येईल .

